| | |
|---|---|
| MHLA050029382025 | दिवाणी कि.अर्ज क्र.८१/२०२५<br>व्यंकट वि.शासन |

<u>नि.क्र.०१ खाली आदेश</u>

०१. मौजे तळेगाव येथील गट क्र.२८/२ आणि २८/१ मधील ४० आर क्षेत्र शासनाने गावठाण भागासाठी संपादीत केले. त्याच्या मंजूर मावेजात वाढ व्हावी म्हणून याकामी भूसंपादन अर्ज क्र.२५७/२००१ (नवा) ४३६/१९९१ (जूना) दाखल होऊन त्यात अर्जदारास वाढीव नुकसान भरपाई मंजूर झाली. त्यात जमा असलेली रक्कम मिळावी म्हणून अर्ज केला आहे.

०२. जाबदारला बजावणी झाली, ते हजर झाले नाही. त्यामुळे, त्याच्याविरुध्द अर्ज एकतर्फा चालला.

०३. सहा.अधिक्षकांनी दिलेल्या अहवालानूसार सदर रक्कम रुपये १,४८,९१४/- ही ठेव पावती क्र.९३१६१३ अन्वये दि.२८/०७/२०१२ रोजी मुदतठेवीमध्ये ठेवली आहे. या प्रकरणी कोणतेही अपील दाखल नाही असा अहवाल अधिक्षकांनी दिला आहे.

०४. याकामी सदरची रक्कम न्यायालयात ठेवण्यात कोणतेही कारण नाही. सदर अर्जदार हे मयत गंगाधर ग्यानोबा खिडसे आणि सुंदरबाई गंगाधर खिडसे यांचे वारस असल्याबद्दल किरकोळ अर्ज क्र.२५१/२०२६ मधील वारस प्रमाणपत्र दाखवते. प्रस्तुत एल.ए.आर. प्रकरणी अपील दाखल नसल्याने अर्जदाराची योग्य ओळख पटवून सदर रक्कम मुदतठेव मोडून त्यावरील होणा-या व्याजासह अर्जदारास अदा करावी.

स्वाक्षरीत/-

(एस.एन.सरडे )

दि.१३/०८/२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.